# मेट्रो- ३ च्या सेवा सुरक्षा मूल्यांकनाचे कंत्राट व्हेरिटास इटालिया कंपनीला

**मुंबई :** मेट्रो-३ च्या सिग्नलिंग व ट्रेन कंट्रोल, प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि रोलिंग स्टॉक सबसिस्टमच्या स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन सेवांसाठीचे कंत्राट देण्यात आले. संबंधित निविदांमधून मे. ब्युरो व्हेरिटास इटालिया एस.पी.ए सोबत हा करार करण्यात आला. एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या की, मेट्रो मार्गाच्या सुरक्षित आणि यशस्वी चलनवलनासाठी स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन (आयएसए) अनिवार्य आहे.